नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ३६० Issue - 360 | वार - शनिवार दि. २३ मे २०२६ Blow- Saturday Date 23 May 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# राज्यात पावसाची हजेरी, उकाड्यापासून दिलासा

## मुंबईत पावसाच्या हलक्या सरी; पुणे, पिंपरीत पावसामुळं रस्त्यावर पाणीच पाणी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर एक दिलासादायक बातमी समोर आली आहे. राज्याच्या काही भागात पावासाने हजेरी लावली आहे. यामुळं नागरिकांना काही प्रमाणात दिलासा मिळाला आहे. उकाड्याने हैराण झालेल्या पुणेकरांना दिलासा मिळाला आहे. त्याचबरोब मुंबई रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यात जोरदार पावसानं हजेरी लावली आहे. पावसानं हजेरी लावल्यामुळं तापमानाचा पारा काही प्रमाणात कमी झाला आहे.

उकाड्याने हैराण झालेल्या पुणेकरांना दिलासा, पावसामुळं रस्त्यावर पाणीच पाणी

उकाड्याने हैराण झालेल्या पुणेकरांना दिलासा मिळाला आहे. पुण्यात पावसानं हजेरी लावली आहे. पुण्यातील कोंढवा परिसरात ज्योती चौकात पावसानंतर रस्त्यावर पाणी भरलं आहे. नागरिकांना वाहने चालवताना त्रास होत आहे. या पावसामुळं वाहतूक संथ गतीनं सुरु आहे. काही दिवसांपासून पुणे शहरात तापमानाचा पारा ४० अंशाच्या पुढे गेल्याचा आपल्याला पाहायला मिळालं होतं. आज सकाळपासून मात्र शहरात ढगाळ वातावरणामुळे दुपारी पावसाला सुरुवात झाली. शहरातील उपनगर तसेच मध्यवर्ती भागात पावसाच्या सरी बरसू लागल्या आहेत. हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार पुढील दोन दिवस पुणे शहरात पावसाची शक्यता आहे. अचानक आलेल्या पावसामुळे निश्चित काही पुणेकरांची तारांबळ उडाली असली तरी सुद्धा उकाडापासून पुणेकरांना नक्कीच या पावसाने दिलासा दिला आहे.

मुंबईत पावसाच्या हलक्या सरी

मुंबईकर आतुरतेने मान्सूनच्या आगमनाची वाट पाहत होते. आज सकाळी मान्सूनपूर्व पावासाला सुरूवात झाल्यामुळे आल्हाददायक वातावरण निर्माण झाले आहे. हलक्या सरी का होईना, पण या पावसामुळे नागरिकांना उकाड्यापासून दिलासा मिळाला आहे.

पिंपरी चिंचवडमध्ये दुपारीचं अंधार, धो-धो पावसाची हजेरी

पिंपरी चिंचवडमध्ये दुपारी चार वाजण्याच्या सुमारास अंधारमय वातावरण झालं आहे. तुफान पाऊसही सुरु झाला आहे. उकाड्याने हैराण झालेले शहरवासीय पावसाची आतुरतेने वाट पाहत होते. अखेर आज ही प्रतीक्षा संपली. गेल्या दोन दिवसांपासून भर दुपारी ढग दाटून येत होते, मात्र पाऊस हुलकावणी देत होता. आज मात्र ढग इतके दाटून आले की अंधारमय वातावरण ही झालं आणि तुफान पाऊस ही कोसळला. यामुळं शहरवासीयांना ताटकळत उभं रहावं लागलं.

रायगड जिल्ह्यात सर्वत्र पावसाची हजेरी

रायगडमध्ये अखेर अवकाळी पावसानं हजेरी लावली आहे. रायगड मधील दक्षिण भागात माणगाव, महाड म्हसळा श्रीवर्धन परिसरात पावसाच्या सरी कोसळत आहेत. हवामान विभागाकडून वर्तविण्यात आलेला अंदाज खरा ठरला आहे. प्रवाशी आणि नागरिकांची तारांबळ उडाली आहे. दक्षिण रायगड नंतर आता उत्तर भागातील खालापूर, खोपोली, कर्जत परिसरात देखील पावसाची तुफान बॅटिंग सुरु आहे. खोपोली परिसरातील बोरघाट, मुंबई पुणे जुना हायवे, एक्स्प्रेस वे सह ग्रामीण भागात देखील पावसाची दमदार बॅटिंग सुरु आहे. अचानक आलेल्या पावसामुळे नागरिकांची तारांबळ उडाली आहे.

सातारा जिल्ह्यातील दुष्काळी खंडाळा तालुक्यात ढगफुटी सदृश्य पाऊस

सातारा जिल्ह्यातील दुष्काळी खंडाळा तालुक्याच्या पश्चिम भागात मान्सूनपूर्व पावसाने जोरदार हजेरी लावत कण्हेरी परिसराला अक्षरशः झोडपून काढलं. वादळी वारे, विजांचा कडकडाट आणि ढगफुटी सदृश्य पावसामुळे ओढे दुथडी भरून वाहू लागले...दरम्यान, अतिट गावात वीज पडून एका गायीचा जागीच मृत्यू झाला असून शेतकरी रामदास जाधव यांचे मोठे नुकसान झाले आहे... तर कण्हेरी परिसरातील वीटभट्ट्यांवरील कच्च्या विटा भिजल्याने सुमारे पंधरा लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे... खंडाळा तालुक्यातील असवली, कण्हेरी, लोहोम, कर्नवडी, घाडगेवाडी, अतिट, कवठे आणि जवळे परिसरात मुसळधार पावसाने हजेरी लावल्याने वातावरणात गारवा निर्माण झाला असला, तरी अचानक आलेल्या या पावसामुळे शेतकरी आणि वीटभट्टी चालक अडचणीत आले आहेत..

रत्नागिरी जिल्ह्यातही पावसाने हजेरी लावली

रत्नागिरी जिल्ह्यातही पावसाने हजेरी लावली आहे. चिपळूणमध्ये मान्सूनपूर्व सरी बरसल्या आहेत. विजांच्या कडकडाटसह चिपळूणमध्ये पावसाच्या हलक्या सरी बरसल्या. उन्हाच्या तीव्रतेने हैराण झालेल्या नागरिकांना उकड्यापासून दिलासा मिळाला आहे. चिपळूणसह खेड गुहागर मध्येही काही भागात पावसाच्या सरी बरसल्या.

# राज्यात अभियांत्रिकी प्रवेश वेळेतच होणार

### विद्यार्थी-पालकांनी संभ्रम बाळगू नये, राज्य सामाईक परीक्षा कक्षाचा खुलासा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई: नॅशनल टेस्टिंग एजन्सीकडून ३ मे रोजी आयोजित करण्यात आलेली नीट यूजी पेपरफुटीमुळं रद्द करण्यात आली. आता नव्यानं नीट यूजी परीक्षा २१ जून रोजी घेण्यात येणार आहे. नीट परीक्षा लांबणीवर पडल्यानं महाराष्ट्रातील अभियांत्रिकी प्रवेशांवर परिणाम होईल अशा चर्चा सुरु झाली होती. मात्र, राज्य सामाईक परीक्षा कक्षानं अभियांत्रिकी प्रवेश वेळेतच होणार असून विद्यार्थी आणि पालकांनी संभ्रम बाळगू नये असं आवाहन केलं आहे.

अभियांत्रिकी प्रवेश वेळेवरच

राज्य सामाईक परीक्षा कक्षानं अभियांत्रिकीचे प्रवेश वेळेत होणार असल्याची माहिती दिली आहे. नीट २०२६ पुनर्परीक्षेमुळे राज्यातील अभियांत्रिकी व औषधनिर्माण अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेला विलंब होणार असल्याचं वृत्त प्रकाशित झाल्यानंतर उएढ कक्षाकडून स्पष्टीकरण देण्यात आलं आहे.

राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या नीट परीक्षा रद्द झाल्याचा फटका अभियांत्रिकी आणि औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांना बसण्याच्या वक्तव्यानं गोंधळ निर्माण झालेला होता. आता मात्र राज्य सामाईक परीक्षा कक्षानं स्पष्टीकरण दिलं आहे.

महाराष्ट्रात नीट परीक्षेचे गुण केवळ ९ विशिष्ट अभ्यासक्रमांनासाठी ग्राह्य मानले जातात. हे ९ अभ्यासक्रम राज्यातील १७ शासनमान्य संस्थांमध्ये उपलब्ध असल्याची माहिती देखील समोर आली आहे.

अभियांत्रिकीच्या अभ्यासक्रमांना प्रवेश मिळवण्यासाठी महाराष्ट्रात एमएचटी-सीईटी आणि नीट परीक्षेतील गुण ग्राह्य धरले जातात. यापैकी ८५ टक्के जागांवरील प्रवेश महाराष्ट्रातील सीईटीच्या आधारे पार पडतात. तर, नीट यूजी परीक्षेतील गुण १५ टक्के जागा भरण्यासाठी ग्राह्य धरतात. अखिल भारतीय कोट्यासाठी नीट परीक्षेतील गुणांचा वापर केला जातो. या स्थितीमुळं महाराष्ट्रातील अभियांत्रिकीची प्रवेश प्रक्रिया वेळेत पार पडण्याची शक्यता आहे.

नीट यूजी परीक्षा लांबणीवर गेलेली आहे. तर, दुसरीकडे एमएचटी-सीईटी परीक्षेचा निकाल जाहीर झालेला नाही. एमएचटी सीईटीचा निकाल जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात जाहीर होऊ शकतो. तर, नीट यूजी परीक्षेचा निकाल कधी जाहीर होणार हे २१ जूनला परीक्षा झाल्यानंतर स्पष्ट होईल.

नीट यूजी परीक्षेचे गुण आवश्यक असलेले ९ अभ्यासक्रम वगळता उर्वरित अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रिया वेळापत्रकानुसार सुरू राहणार आहेत. खउढए च्या नियोजित वेळापत्रकानुसारच प्रवेश प्रक्रिया होणार आहे, अशी माहिती राज्य सामाईक परीक्षा कक्षाकडून देण्यात आली आहे.

# एल निनोच्या पार्श्वभूमीवर सरकारचा ॲक्शन प्लॅन तयार : मुख्यमंत्री

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यात काही भागांत निर्माण झालेल्या इंधन टंचाईच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने कठोर पावले उचलली आहेत. सध्या शेतीचा हंगाम तोंडावर असल्याने डिझेलची मागणी वाढली आहे. या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्वच जिल्हाधिकाऱ्यांनी पेट्रोल-डिझेल, विशेषतः डिझेलच्या वाटपावर जातीने लक्ष घालावे. कोणत्याही स्तरावर इंधनाची अवैध साठेबाजी किंवा काळाबाजार होणार नाही, यावर प्रशासनाने बारीक लक्ष ठेवावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. तसेच, 'एल निनो'च्या संकटामुळे उद्भवणाऱ्या कोणत्याही परिस्थितीचा सामना करण्यासाठी सरकारचा 'ॲक्शन प्लॅन' पूर्णपणे तयार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

जिओ वर्ल्ड सेंटर येथे प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना ते बोलत होते. राज्यातील इंधनाच्या सद्यस्थितीवर भाष्य करताना मुख्यमंत्री म्हणाले की, काही विशिष्ट भागांत इंधनाअभावी तणावाची स्थिती निर्माण झाली आहे, ही वस्तुस्थिती असली तरी ही समस्या सर्वदूर नाही. एखादी स्थानिक घटना घडल्यास तिचा मोठा गाजावाजा होतो, मात्र जनतेने घाबरून जाण्याचे कारण नाही. सध्या डिझेलचा मोठा वापर शेतीकामांसाठी केला जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना प्राधान्याने आणि गरजेनुसार डिझेल उपलब्ध व्हावे, यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना सूक्ष्म नियोजन करण्याचे आदेश दिले आहेत. साठेबाजी करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल.मुख्यमंत्री म्हणाले, एल निनोमुळे यंदा वेगवेगळ्या टप्प्यात पाऊस पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. काही भागांत पावसाचा तीव्र तुटवडा जाणवू शकतो. या नैसर्गिक आव्हानाचा मुकाबला करण्यासाठी शासनाने आधीच एक व्यापक आराखडा तयार केला असून, नागरिकांना आणि शेतकऱ्यांना




दिलासा देण्यासाठी आवश्यक ती सर्व खबरदारी प्रशासनाकडून घेतली जात आहे.

सुनेत्रा पवार यांच्या राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या राज्यसभेच्या जागेबाबत विचारले असता मुख्यमंत्री म्हणाले की, या जागेवर उमेदवारीबाबत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष जो काही निर्णय घेईल, त्याला महायुतीचे पूर्ण समर्थन असेल. महायुतीकडे सत्ताधारी पक्ष म्हणून विधानसभेत २३२ मते आहेत. त्यामुळे या जागेवर विरोधी पक्षाकडून कोणी निवडणूक लढवेल असे मला वाटत नाही. राष्ट्रवादीने एकदा आपला उमेदवार निश्चित केला की, पुढची औपचारिकता तातडीने पूर्ण केली जाईल.

### राज्य शासनाची भूमिका परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले स्पष्ट

# १५ ऑगस्टपर्यंत रिक्षा-टॅक्सी चालकांना व्यावहारिक मराठी शिकणे सक्तीचे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील प्रवाशांसोबत रिक्षा-टॅक्सी चालकांना मराठीत संवाद साधता यावा, यासाठी त्यांना मराठी भाषा शिकविण्याची राज्य शासनाची भूमिका असल्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी स्पष्ट केले. अमराठी रिक्षा-टॅक्सी चालकांनी १५ ऑगस्टपर्यंत व्यावहारिक मराठी भाषा ऑनलाईन अथवा प्रत्यक्ष प्रशिक्षण केंद्रांमध्ये शिकणे सक्तीचे असून, १६ ऑगस्टनंतर कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही. तसेच नियमांचे पालन न करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.रिक्षा-टॅक्सी चालकांसाठी मराठी भाषा प्रशिक्षणासंदर्भात मंत्रालयात आयोजित बैठकीत मंत्री श्री. सरनाईक बोलत होते. या बैठकीस राजेश नार्वेकर, रवी गायकवाड, संदेश चव्हाण, डॉ. ना.कों. भोसले, डॉ. श्यामकांत देवरे, प्रा. सुहासिनी किर्तीकर, डॉ. ज्योती ठाकरे, डॉ. उज्ज्वला मेहेंदळे,





प्रा. डॉ. प्रदीप ढवण, अरुण म्हात्रे, मीनाक्षी जयकर, स्वाती गावडे, शिवाजी गावडे, दीपा ठाणेकर, मोहन पाटील आदी उपस्थित होते.

मंत्री श्री. सरनाईक म्हणाले की, मराठी भाषेचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी परिवहन विभागाने पुढाकार घेतला आहे. त्यानुसार परिवहन विभाग, कोकण मराठी साहित्य परिषद आणि मुंबई मराठी साहित्य संघ यांच्या माध्यमातून राज्यभरात मराठी भाषा अभ्यास केंद्रे उभारण्यात येणार आहेत. तसेच रिक्षा संघटना आणि शिवसेना शाखांमधील उपलब्ध जागांमध्येही ही केंद्रे १५ ऑगस्टपर्यंत सुरू राहणार आहेत. रिक्षा-टॅक्सी चालकांनी ऑनलाईन किंवा आपल्या परिसरातील प्रत्यक्ष केंद्रांमध्ये जाऊन मराठी भाषा शिकून घ्यावी, असे आवाहनही त्यांनी केले.

या प्रशिक्षणासाठी सुमारे चार हजार शिक्षक सहभागी होणार असून, प्रत्येक महिन्यातील चार शनिवार आणि रविवार चालकांच्या सोयीप्रमाणे किमान चार तासांचा अभ्यासक्रम पूर्ण करावा लागणार आहे. काही शिक्षक मानधनाशिवाय प्रशिक्षण देणार असून, काहींना प्रति तास एक हजार रुपये मानधन देण्यात येणार आहे.

मानधनासाठी मराठी भाषा विभागाकडून दोन कोटी रुपयांची तरतूद

मराठी भाषा प्रशिक्षणासाठी आवश्यक मानधनाच्या खर्चासाठी मंत्री श्री. सरनाईक यांच्या विनंतीनुसार मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी पुढाकार घेतला आहे. त्यासाठी दोन कोटी रुपयांचा प्रस्ताव तयार करण्याच्या सूचना त्यांनी दूरध्वनीद्वारे संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. उर्वरित खर्च परिवहन विभागामार्फत करण्यात येणार आहे.

प्रशिक्षणानंतर चालकांना प्रमाणपत्र

रिक्षा-टॅक्सी चालकांनी या उपक्रमात सहभागी होऊन यशस्वीरीत्या प्रशिक्षण पूर्ण केल्यास त्यांना परिवहन विभागामार्फत प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. यासाठी चालकांची मराठी भाषेवरील व्यवहारिक क्षमता तपासण्यासाठी प्रशिक्षण केंद्रांमध्ये तोंडी परीक्षा घेतली जाणार असल्याची माहितीही मंत्री श्री. सरनाईक यांनी दिली.परिवहन विभाग, कोकण मराठी साहित्य परिषद आणि मुंबई मराठी साहित्य संघ यांनी प्रशिक्षण केंद्रांची अंतिम यादी निश्चित करून ऑनलाईन आणि ऑफलाईन सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. रिक्षा-टॅक्सी चालकांची मंगळवारी बैठक आयोजित करण्यात आली असून, त्यांनी विनामूल्य उपलब्ध असलेले ऑनलाईन अथवा ऑफलाईन प्रशिक्षण घेऊन व्यावहारिक मराठी आत्मसात करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. चालकांच्या वेळेनुसार प्रशिक्षणाची व्यवस्था केली जाणार असली, तरी १५ ऑगस्टपर्यंत मराठी भाषा शिकली नाही तर संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा पुनरुच्चार मंत्री श्री. सरनाईक यांनी केला.

प्रशिक्षणासाठी करण्यात आलेली तयारी :

सचित्र आणि सोप्या भाषेतील पाठ्यक्रम पुस्तिका तयार करण्यात आली आहे.

प्रत्येक केंद्रांतर्गत उपकेंद्रे उभारली जाणार आहेत.

रिक्षा-टॅक्सी तसेच ओला, उबेर, रॅपिडो वाहनांवर मराठी संदर्भातील जनजागृती स्टिकर्स लावले जाणार आहेत. मराठी भाषा प्रचार-प्रसारासाठी विशेष बॅनर्स तयार करण्यात येत आहेत.

# जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली अक्कलकोट व चिंचोली एमआयडीसी मधील प्रश्नांवर चर्चा



## सोलापूर जिल्हा उद्योग मित्र समितीची बैठक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जि. मका) : जिल्हा उद्योग मित्र समिती सभेची बैठक दि.२० मे रोजी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीस इंडस्ट्रियल असोसिएशन, अक्कलकोट रोड चखऊ व चिंचोली चखऊ चे सदस्य व अधिकारी तसेच महापालिका अधिकारी उपस्थित होते.

यावेळी इंडस्ट्रियल असोसिएशनच्या वतीने औद्योगिक वसाहतींमध्ये पायाभूत सुविधांची कमतरता असल्याबाबत जिल्हाधिकारी यांच्या समोर मुद्दे मंडण्यात आले. विशेषतः अक्कलकोट चखऊ मध्ये पाणीपुरवठा, खराब रस्ते, ड्रेनेज लाईन आणि रस्त्यावरील लाईट या प्रमुख समस्यांकडे लक्ष वेधण्यात आले.

तसेच शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये टेक्स्टाईल शाखा सुरू करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. पाण्याच्या समस्ये संदर्भात महापालिका आयुक्तांच्या समवेत बैठक घेण्याबाबतही असोसिएशनने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन विनंती केली.

दरम्यान, जिल्हाधिकारी एस. कार्तिकेन यांनी औद्योगिक वसाहतीमध्ये आवश्यक सुविधा पुरविणाऱ्या महापालिकेतील संबंधित अधिकाऱ्यांना सूचना करून येणाऱ्या अडचणींबाबत चर्चा केली.

चखऊ मधील रस्त्यांच्या कामांसाठी शासनाकडून ७५ टक्के, महापालिकेकडून १२.५ टक्के आणि उर्वरित १२.५ टक्के हिस्सा जिल्हा नियोजन व विकास समितीद्वारे उपलब्ध करून देण्यास सुकाणू समितीने मागील बैठकीत मान्यता दिली होती. याबाबत अंमलबजावणी लवकरात लवकर करण्याचे निर्देश देण्यात आले.

अतिक्रमण काढण्याबाबत कडक कारवाईचे आदेश

एमआयडीसी परिसरातील अतिक्रमण काढण्याबाबत सूचना देण्यात आल्या. अतिक्रमण करणारे आणि त्यांना मदत करणारे या दोघांवरही कारवाई करण्याचे आदेश जिल्हाधिकारी यांनी दिले.

बैठक प्रत्येक महिन्याला घेण्याचे निर्देश, तसेच जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक उमेशचंद्र दंडगव्हाळ यांना बैठक दर तीन महिन्यांनी न घेता प्रत्येक महिन्याला घेण्याबाबत सूचना देण्यात आली. प्रत्येक विभाग प्रमुखांनी एमआयडीसी संदर्भातील संबंधित अडचणींचा आढावा घेऊन पुढील पंधरा दिवसांच्या आत तो विषय बैठकीत मांडावा, अशा सूचना देण्यात आल्या.

यावेळी बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, पॉलीटेक्निक कॉलेज आर. व्ही. मुंडे, डायरेक्टर यंत्रमाग संघ नारायण आडकी, उपाध्यक्ष टेक्सटाईल फाउंडेशन सोलापूर जयंत श्री अकेन, जनसंपर्क अधिकारी टेक्स्टाईल फाऊंडेशन सुजय निकते , इंडस्ट्रियल असोसिएशन सेक्रेटरी शिवशंकर आंधळकर, व्यवस्थापक सोलापूर इंडस्ट्रीज असोसिएशन एस. बी. गायकवाड, एस.टी. राठोड प्रादेशिक अधिकारी एमआयडीसी एस.टी. राठोड. उप अभियंता बी.पी. खंदारे, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालक ओंकार चौरे, जिल्हा विकास व्यवस्थापक नाबार्ड नितीन शेळके, जिल्हा उद्योग केंद्र राजशेखर शिंदे, सीनियर कन्सल्टंट पुणे श्रीजीत नायर, जी.डी बाबर खादी ग्रामोद्योग मंडळ आदी महापालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## संपादकीय....

### सरकारची तयारी

'एल निनो'च्या संकटामुळे उद्भवणाऱ्या कोणत्याही परिस्थितीचा सामना करण्यासाठी सरकारचा 'ॲक्शन प्लॅन' पूर्णपणे तयार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी नुकतेच स्पष्ट केले. दरम्यान राज्यातील इंधनाच्या सद्यस्थितीवर भाष्य करताना मुख्यमंत्री यांनी सांगितले की, काही विशिष्ट भागांत इंधनाअभावी तणावाची स्थिती निर्माण झाली आहे, ही वस्तुस्थिती असली तरी ही समस्या सर्वदूर नाही. एखादी स्थानिक घटना घडल्यास तिचा मोठा गाजावाजा होतो, मात्र जनतेने घाबरून जाण्याचे कारण नाही. सध्या डिझेलचा मोठा वापर शेतीकामांसाठी केला जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना प्राधान्याने आणि गरजेनुसार डिझेल उपलब्ध व्हावे, यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना सूक्ष्म नियोजन करण्याचे आदेश दिले आहेत. साठेबाजी करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल. एल निनोमुळे यंदा वेगवेगळ्या टप्प्यात पाऊस पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. काही भागांत पावसाचा तीव्र तुटवडा जाणवू शकतो. या नैसर्गिक आव्हानाचा मुकाबला करण्यासाठी शासनाने आधीच एक व्यापक आराखडा तयार केला असून, नागरिकांना आणि शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी आवश्यक ती सर्व खबरदारी प्रशासनाकडून घेतली जात आहे. राज्यात काही भागांत निर्माण झालेल्या इंधन टंचाईच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने कठोर पावले उचलली आहेत. सध्या शेतीचा हंगाम तोंडावर असल्याने डिझेलची मागणी वाढली आहे. या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्वच जिल्हाधिकाऱ्यांनी पेट्रोल-डिझेल, विशेषतः डिझेलच्या वाटपावर जातीने लक्ष घालावे. कोणत्याही स्तरावर इंधनाची अवैध साठेबाजी किंवा काळाबाजार होणार नाही, यावर प्रशासनाने बारीक लक्ष ठेवावे. उतरत्या क्रमाने पाऊस असण्याची शक्यता आहे. जूनमध्ये पाऊस येईल. त्यापेक्षा कमी जुलैमध्ये येईल. त्यापेक्षा कमी ऑगस्ट आणि त्यापेक्षा कमी सप्टेंबरमध्ये असा प्राथमिक अंदाज आहे. पावसाच्या दोन दिवसांमध्येही मोठं अंतर येण्याची शक्यता आहे. त्यामुळे पिकांवर परिणाम होतो. त्यामुळेच जलयुक्त शिवारचे कामे वेगाने करण्याचे आदेश दिले आहेत.

# तरुणीसह तिच्या मित्रावर ॲसिड हल्ला, धक्कादायक घटनेने पुणे हादरले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : पुण्यात एक धक्कादायक घटना समोर आली आहे. तू माझी नाही झालीस, तर कोणाची नाहीस असे म्हणत पुण्यात तरुणी आणि तिच्या मित्रावर ॲसिड हल्ला करण्यात आल्याची घटना घडली आहे. पुणे पोलिसांनी कर्नाटकमध्ये जाऊन या प्रकरणातील आरोपीला बेड्या ठोकल्या आहेत. पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेनं ही कारवाई केली आहे. मित्रासोबत 'लिव्ह-इन रिलेशनशिप'मध्ये राहत असल्याच्या रागातून तरुणाने ॲसिड हल्ला केल्याची घटना घडली आहे. तू माझ्यासोबत का राहत नाहीस? तू माझी नाही झालीस, तर कोणाचीच होऊ देणार नाही, असे म्हणत एका माथेफिरुने तरुणीवर आणि तिच्या मित्रावर ॲसिड हल्ला करून त्यांना गंभीर जखमी केले आहे. श्रीराम मधु सरुनवर (वय २०) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. २१ वर्षीय पीडित तरुणीने याबाबत बंडगार्डन पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. हा सगळा प्रकार २० मे रोजी रात्री २ वाजण्याच्या सुमारास पुण्यातील ताडीवाला रोड येथे घडला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी तरुणी आणि तिचा मित्र हे दोघे पुण्याच्या एका हॉटेलमध्ये काम करतात. काम संपल्यानंतर बुधवारी पहाटे दोघेही ताडीवाला रोड येथील आपल्या राहत्या घराच्या दिशेने निघाले होते. याचवेळी आरोपी सरुनवर दबा धरुन बसला होता. पीडित तरुणी ही त्याचा रोष झुगारुन मित्रासोबत लिव्ह-इनमध्ये राहते, याचा राग त्याच्या मनात होता. श्रीरामने तिचा रस्ता अडवला आणि तू माझ्यासोबत का राहत नाहीस? तू माझी नाही तर कोणाचीच होऊ देणार नाही, अशी धमकी दिली. काही समजण्याच्या आतच, आरोपीने स्वत:सोबत आणलेल्या प्लास्टिक ड्रममधील 'ॲसिड'सारखा तीव्र ज्वलनशील रासायनिक पदार्थ तरुणीच्या अंगावर फेकला. हे केमिकल तरुणीच्या मानेवर, पाठीवर आणि दोन्ही पायांवर पडल्याने ती जागीच होरपळली. आरोपीने तिच्या मित्रांवर सुद्धा ॲसिड फेकले, ज्यामुळे त्याच्याही पायाला गंभीर दुखापत झाली. दोघेही जखमी झाले असताना, आरोपीने अंधाराचा फायदा घेऊन तिथून पसार झाला. शहराच्या मध्यवस्तीत तरुणीवर ॲसिड हल्ला झाल्याचे समजताच पोलीस दलात प्रचंड खळबळ उडाली आहे. पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने आरोपीचा शोध घ्यायला सुरुवात केल्यानंतर पोलिसांनी थेट कर्नाटक गाठत आरोपीच्या मुसक्या आवळल्या आहेत.

# 'इबोला'चा धोका! भारत-आफ्रिका शिखर परिषद पुढे ढकलली; विमानतळांवर हाय अलर्ट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : आफ्रिका खंडात पसरत असलेल्या जीवघेण्या 'इबोला' व्हायरसच्या संकटामुळे भारत आणि आफ्रिकन युनियनने मोठा निर्णय घेतला आहे. येत्या २८ ते ३१ मे २०२६ दरम्यान नवी दिल्लीत होणारी चौथी 'भारत-आफ्रिका मंच शिखर परिषद' काही काळासाठी पुढे ढकलण्यात आली आहे. या परिषदेची नवीन तारीख अजून जाहीर करण्यात आलेली नाही.

जागतिक आरोग्य संघटनेने काँगो आणि युगांडामधील इबोलाच्या उद्रेकाला आंतरराष्ट्रीय आणीबाणी घोषित केल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला आहे. डब्लूएचओचे प्रमुख डॉ. टेड्रोस अधानोम घेब्रेयेसूस यांनी दिलेल्या माहितीनुसार, या उद्रेकामुळे आतापर्यंत १३० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला असून, ५०० हून अधिक संशयित रुग्ण आढळले आहेत. कोवीड नंतर इबोला व्हायरसचा धोका वाढू नये, ह्यासाठी उपाययोजना करण्यात येत असून खबरदारी म्हणून काळजी घेण्याचे आवाहन आरोग्य मंत्रालयाने केले आहे.

आरोग्य मंत्रालयाकडून नियमावली जाहीर

इबोला व्हायरसचा धोका लक्षात घेता भारताच्या केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने आणि दिल्ली विमानतळाने तात्काळ मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. काँगो, युगांडा आणि दक्षिण सुदान या अतिधोकादायक देशांतून येणाऱ्या किंवा तेथून प्रवास करणाऱ्या प्रवाशांवर विशेष लक्ष ठेवले जात आहे.

जर कोणत्याही प्रवाशाला तीव्र ताप, थकवा आणि डोकेदुखी, स्नायू दुखणे आणि घसा खवखवणे, उलट्या आणि जुलाब होणे, शरीरातून अचानक रक्तस्राव होणे अशी लक्षणे आढळल्यास त्यांनी विमानतळावरील आरोग्य अधिकाऱ्यांना त्वरित माहिती देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

२१ दिवसांचा 'वॉच पिरियड'

आरोग्य मंत्रालयाने स्पष्ट केले आहे की, बाधित देशांतून परतलेल्या प्रवाशांनी भारतात आल्यानंतर पुढील २१ दिवसांच्या आत वरीलपैकी कोणतीही लक्षणे दिसल्यास त्वरित वैद्यकीय मदत घ्यावी. तसेच डॉक्टरांना आपल्या प्रवासाचा इतिहास नक्की सांगावा. जर कोणी इबोला संशयित रुग्णाच्या संपर्कात आले असेल, तर त्यांनी स्वत:हून प्रशासनाला माहिती देणे बंधनकारक आहे.

भारत-आफ्रिका संबंध कायम मजबूत

परिषद पुढे ढकलली असली तरी भारत आणि आफ्रिकेने आपले संबंध अधिक दृढ राहतील अशी ग्वाही दिली आहे. दोन्ही बाजूंनी प्रसिद्ध केलेल्या संयुक्त पत्रकात म्हटले आहे की, ''भारत आणि आफ्रिका यांच्यात दीर्घकाळापासून परस्पर आदर आणि सहकार्याची भावना आहे. सध्याच्या आरोग्य संकटाचा सामना करण्यासाठी भारत आफ्रिकेला पूर्ण सहकार्य करेल.''

# सर्वंकष लैंगिकता शिक्षणाने कृतिशील तरुणाईला मिळाला सक्षम मार्ग

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : आजच्या तरुण पिढीसमोर सोशल मीडियाचे वाढते व्यसन, तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन, सायबर गुन्हे, लैंगिक शोषण आणि मानसिक तणाव यांसारखी गंभीर आव्हाने उभी ठाकली आहेत. अशा परिस्थितीत युवकांना योग्य दिशा देण्यासाठी सर्वंकष लैंगिकता शिक्षण (उेाशि-हशपीळींश ड्युशिश्रळीं एर्वी-लरींळेप) अत्यंत आवश्यक असून, हे शिक्षणच सजग, सुदृढ आणि जबाबदार समाज घडविण्यासाठी प्रभावी माध्यम ठरू शकते, असे मत युवा (तरुणाई) शिबिराच्या दुसऱ्या दिवशी सहभागी युवक-युवतींनी व्यक्त केले.




सोलापूर शहरातील कामगार वसाहतीमध्ये राहणाऱ्या युवक युवतींसाठी दहा दिवशीय युवा शिबिराचे आयोजन सारथी कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्र विनायक नगर येथे सारथी युथ फाऊंडेशन यांच्यावतीने करण्यात आले आहे.

प्रिसिजन फाउंडेशन, सोलापूर आणि फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखेच्या संयुक्त विद्यमाने सारथी युथ फाऊंडेशन येथे शिबीराच्या दुसऱ्या दिवशी सर्वंकष लैंगिकता शिक्षण प्रशिक्षण घेण्यात आले.

कार्यक्रमास सारथी युथ फाऊंडेशनचे अध्यक्ष जावेद नगारे, सचिव रामचंद्र वाघमारे, फॅमिली प्लॅनिंग असोसिएशनचे कार्यक्रम अधिकारी वीरेंद्र परदेशी आदींची प्रमुख उपस्थिती होती. प्रिसिजन फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. सुहासिनी शहा यांच्या दूरदृष्टीतून सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमामुळे युवकांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, आरोग्याविषयी जागरूकता आणि सामाजिक जबाबदारीची भावना विकसित होत असल्याचे मत वीरेंद्र परदेशी यांनी व्यक्त केले.

शिबिरात कम्युनिटी मोबिलायझर सत्यभामा कांबळे, विकी शिवशरण, संध्या वाघमारे तसेच लॅब टेक्निशियन प्रीती चौधरी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी विद्यार्थ्यांची हिमोग्लोबिन तपासणीही करण्यात आली. प्रशिक्षणादरम्यान किशोरावस्था, सकस आहार, वैयक्तिक स्वच्छता, मासिक पाळी स्वच्छता, वयात येताना होणारे शारीरिक व मानसिक बदल, एचआयव्ही/एड्स प्रतिबंध, कॅन्सरविषयक जागरूकता, चांगला व वाईट स्पर्श, पोक्सो कायदा, सायबर गुन्हे, लैंगिक अत्याचार प्रतिबंध आणि सुरक्षित डिजिटल वापर यांसारख्या महत्त्वपूर्ण विषयांवर वैज्ञानिक व समुपदेशनात्मक माहिती देण्यात आली.

सर्वंकष लैंगिकता शिक्षणामुळे युवकांमध्ये आत्मविश्वास वाढतो, निर्णयक्षमता विकसित होते, लैंगिक व प्रजनन आरोग्याविषयी योग्य समज निर्माण होते आणि बालविवाह, लैंगिक अत्याचार, व्यसनाधीनता व असुरक्षित संबंधांपासून संरक्षण मिळण्यास मदत होते, असेही मार्गदर्शकांनी स्पष्ट केले.

प्रिसिजन फाउंडेशनचे जनसंपर्क व्यवस्थापक नितीन फलटणकर आणि वैशाली बनसोडे यांच्या नियोजनातून कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक रामचंद्र वाघमारे यांनी केले. सूत्रसंचालन कांचनी सुरवसे यांनी केले तर आभार योगेश हसरभावे यांनी मानले.

# चळे येथे विज कार्यालया समोर शेतकरी करणार रक्ताचा अभिषेक




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर तालुक्यातील चळे येथील वीज वितरणच्या कार्यालयातील वीज वितरण पुरवठ्याबाबत चळे येथील शेतकरी आक्रमक झाला असून सोमवार दिनांक २५ मे रोजी सकाळी दहा वाजता राज्याचे मुख्यमंत्री तसेच सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री मतदार संघाचे खासदार व आमदार यांच्या प्रतिमेवर शेतकऱ्याच्या रक्ताने अभिषेक करून महावितरण चळे कार्यालयासमोर आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे या आंदोलनाची प्रत पंढरपूर तहसील कार्यालय तसेच तालुका पोलीस स्टेशन व वीज वितरण कार्यालय पंढरपूर व चळे येथे देण्यात आले आहे.शेतकऱ्यांना वारंवार विज पुरवठा सुरळीत करण्याचे खोरे आश्वासन संबंधित विज वितरण अधिकारी यांचे कडून देण्यात येत आहेत. चळे येते आठ तास शेतीसाठी विद्युत पुरवठा केला जातो त्यातूनही चार ते पाच वेळा ओव्हरलोड म्हणून बंद करण्यात येतो. त्यानंतर २४ तासांपैकी आठ तास शेतीसाठी सप्लाय व राहिलेली सोळा तास विद्युत पुरवठा ओव्हरलोड मुळे बंद केला जातो म्हणजे १६ तास सिंगल फेज दिली जात नाही त्यामुळे चळे येथील युवा शेतकरी आता आमदार, खासदार तसेच जिल्हा परिषद सदस्य पंचायत समिती सदस्य यांना वैतागलेला असून आता शेतकऱ्यांनी आक्रमकपणे आपला प्रश्न आपणच सोडवायचा या धर्तीवर आता चळे विज कार्यालय येथे मुख्यमंत्री,पालक मंत्री, खासदार व आमदार यांच्या प्रतिमेला रक्ताभिषेक करून आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# आषाढी वारी २०२६ यशस्वी होण्यासाठी सर्व शासकीय विभागांनी समन्वय ठेवून कामे करावीत

## जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन ; सर्व पालखीमार्ग वरील कायमस्वरुपी शौचालये त्वरित दुरुस्ती करून घ्यावीत

- पंढरपूर नगर परिषद, पंढरपूर उप विभागीय अधिकारी, जिल्हा परिषद तसेच संबंधित विभाग यांनी आषाढी वारी साठी करावयाच्या विविध कामासाठी निधी मागणी प्रस्ताव तत्काळ सादर करा
- मानाच्या पालख्या तसेच वारकरी, भाविक यांना उत्कृष्ट सोयी उपलब्ध करुन द्याव्यात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




सोलापूर : यावर्षी आषाढी एकादशी यात्रा दिनांक २५ जुलै २०२६ रोजी पार पडणार असून ती शांततेत व नियोजनबद्ध पद्धतीने यशस्वीपणे पार पाडण्यासाठी सर्व शासकीय विभागांनी परस्परात योग्य समन्वय ठेवून कामे करावीत. तसेच सर्व पालखी मार्ग व पंढरपूर शहरात वारकरी भाविकांना प्रशासनाच्या वतीने उपलब्ध करून देण्यात आलेल्या सोयीसुविधामुळे त्यांचे समाधान करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी केले.

नियोजन भवन येथे आषाढी वारी २०२६ नियोजनाबाबत आयोजित आढावा बैठकीत जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन मार्गदर्शन करत होते. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, अपर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, पंढरपूर उप विभागीय अधिकारी सचिन इथापे, पंढरपूर नगर परिषदेचे मुख्याधिकारी महेश रोकडे, गटविकास अधिकारी अमोल जाधव, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तीसागर ढोले, प्रादेशिक परिवहन अधिकारी गजानन नेरपगार, सार्वजनिक बांधकाम विभागाने अधीक्षक अभियंता श्याम कुंभार, महावितरणचे अधीक्षक अभियंता सुनील माने यांच्या सह सर्व संबंधित विभाग प्रमुख उपस्थित होते.

जिल्हाधिकारी कार्तिकेयन पुढे म्हणाले की, आषाढी वारी २०२६ मध्ये पालखी मार्गावर तसेच विसावा व मुक्कामाच्या ठिकाणी सुविधा निर्माण करण्यासाठी टेंडर प्रक्रिया राबवायची आहे अशा विभागांनी कामांची यादी २३ मे २०२६ अखेरपर्यंत प्रशासनाला सादर करावी. त्यानंतर प्रशासनाच्या वतीने विधान परिषद निवडणूक आचारसंहितेच्या अनुषंगाने आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर या कामांना सवलत देण्याबाबत मुख्य निवडणूक अधिकारी महाराष्ट्र राज्य यांच्याकडे प्रस्ताव सादर करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

तसेच जिल्हा परिषद, पंढरपूर नगरपरिषद अन्य नगरपरिषद व विभागांना वारी कालावधीत विविध कामे करण्यासाठी निधी मागणीचे प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीकडे शनिवारी सायंकाळपर्यंत प्राप्त झाले पाहिजेत. त्यानंतर त्या प्रस्तावावर पालकमंत्री महोदय यांची मान्यता घेऊन निधी मंजुरीची कार्यवाही करणे शक्य होणार आहे. त्याप्रमाणेच सर्व विभागांनी त्यांना कोणत्याही प्रकारची अडचण असेल तर त्वरित आपल्याशी, पोलीस अधीक्षक व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा. आषाढी वारी ही कुंभ मेळाव्यानंतर सर्वात मोठी यात्रा आहे. तसेच प्रत्येक वारी नाविन्यपूर्ण असते त्यामुळे प्रत्येक यंत्रणांनी त्यांच्यावर असलेली जबाबदारीचे काटेकोरपणे नियोजन करावे असेही जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी सुचित केले.

एसटी महामंडळाने यावर्षीच्या वारीसाठी राज्यभरातून ५४०० बसेस ची व्यवस्था केलेली आहे तरी महामंडळाने त्यांच्या सर्व बसेसची तपासणी करून घ्यावी. त्या रस्त्यामध्ये कुठेही बंद पडणार नाहीत याची खात्री करावी. नेहमीप्रमाणे पंढरपूर शहरात तात्पुरते बस स्थानक उभारून त्या ठिकाणी मोबाईल टॉयलेटची व्यवस्था करावी व ते स्वच्छ राहील या दृष्टीने काटेकोरपणे नियोजन करावे अशा सूचना जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी दिल्या. अन्न व औषध विभागाने पंढरपूर शहर येथील सर्व हॉटेल्स किराणा दुकाने व अन्नपदार्थाची तपासणीसाठी पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध करावे. कोणत्याही प्रकारचा अन्नपदार्थातून अनुचित प्रकार घडणार नाही याची दक्षता घ्यावी. तर पाटबंधारे विभागाने भीमा नदीपत्रात वारी कालावधीत आवश्यक पाणी सोडावे. भीमा नदीपत्रातील होड्यांच्या दृष्टीने योग्य ती दक्षता घ्यावी असेही त्यांनी म्हटले.

मंदिर समितीने तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातील राहिलेली कामे त्वरित पूर्ण करून घ्यावीत. तसेच वारी कालावधीत पत्रा शेड तसेच भाविकांना आवश्यक सर्व सोयी सुविधा व्यवस्थित राहतील याची दक्षता घ्यावी. यावर्षीही वारी कालावधीत व्हीआयपी दर्शन बंद राहील असेही जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी सांगितले. वारकरी भाविकांना दर्शन घेण्यात कोणत्याही प्रकारची अडचण येणार नाही या दृष्टीने प्रयत्न करावेत.

संपूर्ण पालखी मार्ग, पालखीचे विसावा ठिकाणी, मुक्कामाचे ठिकाणी, पंढरपूर शहरात भक्ती सागर पत्रा शेड या ठिकाणी मोबाईल टॉयलेटची व्यवस्था चांगली करावी. त्यावर स्वच्छतेसाठी पुरेशी मनुष्यबळ उपलब्ध करावे व पाण्याच्या टँकरची व्यवस्था करावी. तसेच ज्या ठिकाणी कायमस्वरूपी शौचालय आहेत त्या शौचालयांची संपूर्ण दुरुस्ती करून घ्यावी. इथे येणाऱ्या भाविकांना वारकऱ्यांना शौचालयाची चांगली व्यवस्था राहील या दृष्टीने सर्व संबंधितांनी प्रयत्न करावेत असे निर्देश जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी दिले.

पालखी मार्गावरील अंगणवाडी शाळा प्राथमिक आरोग्य केंद्र त्यांच्या दुरुस्तीची आवश्यकता असेल तर निधी मागणीचे प्रस्ताव तात्काळ सादर करावेत. पोलीस विभागाने त्यांना आवश्यक असलेल्या ७०० बँकेतील चा प्रस्ताव द्यावा. जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाने वारी कालावधीसाठी आवश्यक औषधी खरेदी वेळेत करावी. जिल्हा शल्य चिकित्सक यांनी आरोग्य पथके तयार करावीत मोबाईल आरोग्य पथकेही तयार करावेत. पालखी विसावा ठिकाण व मुक्कामाच्या ठिकाणी पालखी गेल्यानंतर तात्काळ त्या ठिकाणी स्वच्छता मोहीम राबवावी, अशा सूचना जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी केल्या.

जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पालखी महामार्गावर ग्रामीण भागात पालखी व भाविकांना सोयी सुविधा देण्यासाठी ६१ कोटीच्या निधीचा आराखडा तयार केलेला आहे. या अंतर्गत दहा हजार मोबाईल टॉयलेट, पालखी मुक्कामाच्या ठिकाणी तसेच अन्य २२ ठिकाणी जर्मन हँगर मंडप उभारला जाणार आहे. यातून वारकऱ्यांना आरोग्य सुविधा, चार्जिंग स्टेशन, पाणीपुरवठा, पालखी मुक्कामाच्या ठिकाणी मुरमीकरण रस्ते आदी कामे प्रस्तावित करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी माळशिरस उपविभागीय अधिकारी विजया पांगरकर यांनी पालखी मार्गावर केलेल्या व आवश्यक असलेल्या सुविधांची माहिती दिली. पंढरपूर नगर परिषदेचे मुख्य अधिकारी महेश रोकडे यांनी नगर परिषदेच्या वतीने पंढरपूर शहरात भाविकांसाठी नियोजित असलेल्या उपाययोजनांची माहिती दिली. यामध्ये भक्ती सागर येथे एक हजार ऐंशी कायमस्वरूपी टॉयलेट उभारलेले आहेत व वाखरी पालखी तळावर दोन हजार मोबाईल टॉयलेट उपलब्ध केले जाणार आहेत. तर दोनशे सफाई कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. तर मंदिर समितीच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी भाविकांसाठी देण्यात येणार असलेल्या आरोग्य सुविधा, पाणी जेवण सुरक्षा यंत्रणा या अनुषंगाने सविस्तर माहिती दिली.

---

# शेतकरी उत्पादक कंपनी, सहकारी संस्थां यांनी मूल्य साखळी भागीदार निवडी करीता ३० मे पर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : राष्ट्रीय खाद्यतेल अभियान तेलबिया या नवीन अभियानाला मंजुरी दिली आहे. यात समूह आधारित कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. सदर अभियानांतर्गत सोयाबीन, करडई, सुर्यफुल या पिकांसाठी सोलापुर जिल्हयाची निवड करण्यात आली असून राष्ट्रीय खाद्यतेल अभियान-तेलबिया (NMEO-OS) अंतर्गत जिल्हा तेलबिया अभियान समितीने निवड केलेल्या पिकनिहाय मूल्य साखळी भागीदार (VCP) यांचे मार्फत समूहामध्ये प्रमाणित बियाणे वितरण, शेतकरी प्रशिक्षण व शेतकरी शेतीशाळा इ. घटक राबवायचे आहेत. तसेच मूल्य साखळी भागीदार (VCP) यांना व्यवस्थापन खर्च, मूल्य साखळी समुहामधील (VCP) शेतकऱ्यांचे माती परिक्षण, सीड हब, इश्रेलज्ञ प्रात्यक्षिके, काढणीत्तोर सुविधा सहाय्य, कृषि मॅपरवर लाभार्थ्यांची माहिती भरणे इ. घटकांचा समावेश आहे. सन २०२६-२७ करिता पिकनिहाय मूल्य साखळी भागीदार तउझी) यांची मा. जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील जिल्हा तेलबिया अभियान समितीच्या मान्यतेने खालील निकषांच्या आधारे निवड करावयाची आहे.

**निकष–**

मूल्य साखळी भागीदार (VCP) म्हणून निवड करावयाच्या शेतकरी उत्पादक कंपनी (FPCS) / सहकारी संस्थांसाठी पात्रता निकषः )

कंपनी कायदा किंवा सहकारी कायद्यांतर्गत नोंदणी केलेली असावी. ज्या तालुक्यात समुह तयार झाला आहे तेथे काम करण्याचा किमान ३ वर्षांचा अनुभव असावा. म्हणजेच नोंदणी माहे मार्च, २०२३ पूर्वीची असावी.

किमान २०० शेतकरी उत्पादक कंपनी (FPCs) किंवा सहकारी संस्थेमध्ये नोंदणीकृत असावेत.

सहकारी संस्था असल्यास संस्थेच्या उद्दिष्टांमध्ये तेलबिया पिकांत कामकाजाबाबत नमूद असावे.

मागील ३ वर्षातील सरासरी वार्षिक उलाढाल ९ लाख रुपयांपेक्षा जास्त असावी.

शेतकरी उत्पादक कंपनी (FPCs) मध्ये शेतकऱ्यांचा किमान ३ लाख रुपयांचा समभाग असावा.

शेतकरी उत्पादक कंपनी / सहकारी संस्था प्राधान्याने कमी उत्पादकता असणा-या तालुक्यांमध्ये कार्यरत असावी.

शासन अनुदानित शेतकरी उत्पादक कंपनी / सहकारी संस्था यांना प्राधान्य दिले जाईल.

१० हजार शेतकरी उत्पादक संघ (FPOs) योजनेंतर्गत तयार केलेले शेतकरी उत्पादक कंपनी (FPCs), NFED, NSC-OS इत्यादी

सार्वजनिक संस्थांकडे नोंदणीकृत तेलबियांशी संबंधित शेतकरी उत्पादक कंपनी (FPCs) यांना वरील पात्रता निकषांच्या पूर्ततेच्या अधीन राहून प्राधान्य दिले जाईल.

तरी प्रस्तुत योजना मार्गदर्श सुचनांच्य अधीन राहून वरील निकषांचे पूर्तता करु शकणाऱ्या इच्छुक शेतकरी कंपनी (FPCs)/सहकारी संस्था यांनी सोयाबीन, सुर्यफुल व करडई या पिकांसाठी स्वतंत्रपणे दि. ३० मे २०२६ पर्यंत वरील निकषांच्या पुर्तते करीता आवश्यक त्यासर्व कागदपत्रांसह तालुका कृषि अधिकारी कार्यालयास विहित नमुन्यात कंपनीच्या लेटर हेडवर संचालक मंडळाच्या ठरावासह अर्ज करण्यात यावा. अर्जाचा नमुना सर्व तालुका कृषि अधिकारी कार्यालय व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालय, सोलापुर येथे उपलब्ध आहे. अधिक माहितीकरीता संबंधित तालुका कृषि अधिकारी, कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, शुक्राचार्य भोसले, यांचे मार्फत करण्यात आले आहे.

---

# पंढरपूर नगर परिषदेमार्फत स्वीपर रोड मशीन कार्यान्वित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर स्वच्छ, व पंढरपूर सुंदर करण्यासाठी पंढरपूर नगर परिषदेची स्वीपर रोड मशीन दुरुस्त करून पुन्हा कार्यान्वित करण्यात आली आहे. यावेळी लोकनियुक्त नगराध्यक्ष डॉ. सौ प्रणिता ताई भालके यांच्या हस्ते पूजा करण्यात आली.

पंढरपूर शहर व बाहेरून येणारी नागरिक धुळे मुळे हैराण झाले होते. धूळ साफ करणारी मशीन तब्बल पाच ते सात वर्षे बंद होती. बंद असल्यामुळे धूळ खात पडली होती.

मागील सत्यदारांनी याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले होते. शहर अधिक सुंदर वधु मुक्त करण्याचे संकल्प ठेवून नागरिकांना अधिक चांगल्या सुविधा देण्यासाठी सतत आणि प्रयत्न सुरू असून आधुनिक यंत्रणेमुळे शहरातील रस्ते स्वच्छ ठेवण्यास मशीनची मदत होणार आहे.

रस्त्यावरील धूळ कचरा साफ करण्यासाठी आणि घाण साफ करण्यासाठी, आधुनिक स्वीपर मशीन प्रभावीपणे कार्य करणार असून शहरातील स्वच्छते मोहिमाला अधिक गती मिळणार आहे. स्वच्छ पंढरपूर सुंदर पंढरपूर या संकल्पना प्रत्यक्ष कृतीत उतरून स्वच्छतेवर भर देण्यात येत असून लोकनिवृत्त नगराध्यक्ष डॉ. सौ प्रणिता भालके यांनी आपली भावना व्यक्त केल्या.

यावेळी उपस्थित नगरसेवक सुधीर धोत्रे, संजय बनपट्टे, किरण घाडगे, आदित्य फत्तेपूरकर, अक्षय गंगेकर, लोकेश यादव, प्रसाद भैय्या कळशे, विनायक देवमारे सुधीर भोसले, भीमा आप्पा माळी, मोहम्मद वस्ताद, मनमोहन अभंगराव, बापू चौधरी बंडू डोईफोडे, विशाल आर्वी, तसेच नगरपालिकेचे आरोग्य विभागाचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

**निवडणुकीसाठी मोर्चेबांधणी सुरु**

**पदाधिकारी, कार्यकर्त्यांना दिल्या सूचना**

# परिचारक यांच्या मार्केट यार्ड बैठकीस सस्पेन्स कायम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर/प्रतिनिधी : सोलापूर जिल्हा आणि स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसाठी परिचारक यांनी मोर्चे बांधणी केली असलेली दिसून येत आहे. परिचारक गटातील कार्यकर्त्यांना कामाला नारळाच्या सूचना देऊन सस्पेन्स कायम ठेवला आहे.

सोलापूर जिल्हा स्थानिक स्वराज्य संस्थेची विधान परिषद निवडणूक घेण्यात येणार असल्याचे ६१६ मतदार आहेत या मतदारांचे बॅलेट पेपरवर मतदान मतदानाचा हक्क बजावणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्था विधान परिषदेची उमेदवारी मिळवण्यासाठी माजी आमदार प्रशांतराव परिचारक यांनी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली आहे. यानंतर त्यांनी मार्केट कमिटी मध्ये त्याच्या कार्यकर्त्यांची गुप्त बैठक घेतली आहे. पदाधिकाऱ्यांना कामाला लागावे असे सूचना दिल्या आहेत. परिचारक यांचे निष्ठावंत पदाधिकारी अर्बन बँकेचे चेअरमन श्री सतीश मुळे, मार्केट कमिटी चेअरमन हरीश दादा गायकवाड, नगरसेवक अँड सुनील वाळुंजकर, पंचायत समितीचे सभापती श्री शुभम आगवणे, श्री लक्ष्मण पापरकर, भाजप तालुका अध्यक्ष सुभाष मस्के, राजू गावडे,

परिचारक यांची कार्यकर्त्यांची मार्केट यार्ड मध्ये गुप्त बैठक घेत आहे. मुंबईमध्ये परिचारक गटाची किंग मेकर उमेश परिचारक मुंबई ते मुक्काम ठोकून असल्याची समजते. विधान परिषदेचे उमेदवार मिळवण्यासाठी रसिकेत सुरू असल्याचे दिसून येत आहे. माजी आमदार राजन पाटील, माजी आमदार दिलीप माने, माजी आमदार राजेंद्र राऊत, माजी आमदार राम सातपुते, श्री राजेंद्र राऊत यांची ५०० कार्यकर्ते महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री यांना भेटण्यासाठी गेल्याची समजते. एकंदरीत विधानपरिषदेच्या निवडणुकीची तयारी परिचय त्यांनी केल्याची दिसून येत आहे. २०२४विधानसभे सभेसाठी परिचारक यांनी तयारी केली होती मात्र महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे त्यांनी तुम्हाला विधान परिषदेवर संधी दिली

**मार्केट यार्ड सस्पेस मिटींगला काही कार्यकर्त्यांना डावलण्यात आले आहे.**

जाईल अशी आश्वासन दिले होते मात्र दोन वेळा परिचारक यांना लावण्यात आले आहे. त्यामुळे परिचारक गटामध्ये आश्वासन असल्याचे दिसून येत आहे. सध्या परिचयांनी विधान परिषदेची तयारी सुरू केली सू असल्याचे दिसून येत आहे. त्यांनी कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांना कामाला लागा अशा सूचना दिल्या आहेत. त्यामुळे परिचारक यांना उमेदवारी मिळणार असल्याची संकेत दिसू लागली आहे.

---

# वाळूजचे सुपुत्र सुनील गोवर्धन धनवे यांची सहाय्यक पोलीस निरीक्षकपदी नियुक्ती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : मोहोळ तालुक्यातील वाळूज जिल्हा सोलापूर येथील सुपुत्र श्री सुनील गोवर्धन यांची महाराष्ट्र पोलीस दलाल पोलीस उपनिरीक्षक पीएसआय पदावरून सहाय्यक पोलीस निरीक्षक (API) पदावर पदोन्नती झाले आहे त्यांचा या उल्लेखनीय देशाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

. सामान्य शेतकरी कुटुंबातील असलेला सुनील धनवे यांची अत्यंत प्रतिकूल परिस्थिती असून पूर्ण केली आहे त्यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण वाळूज येथील जिल्हा परिषद शाळेत व वाळूज प्रशाला वाळूज हायस्कूल मध्ये झाली तर महाविद्यालयीन शिक्षण सोलापूर येथील दयानंद कॉलेजमध्ये झाले फोटो परीक्षा माहितीच्या जोरावर त्यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेत प्रथम प्रयत्नात यश मिळवत एप्रिल २०१५ मध्ये PSI पदी नियुक्ती

सन २०१५ १६ या कालावधीत त्यांनी नाशिक येथील प्रशिक्षण पूर्ण केले त्यानंतर कोल्हापूर परिक्षेत्रातील कवठेमंकाळ जिल्हा सांगली येथे सभा वर्ष सेवा बदलली पुढे गोंदिया आणि गडचिरोली येथे त्यांनी कर्तव्य पार पाडले उघडचिरोलीला परीक्षा त्रास साडेतीन वर्ष सेवा देताना त्यांनी छत्तीसगड आणि मध्य प्रदेश सीमेल नगरच्या नक्षलग्रस्त भागात धाडसी मोहिमेमध्ये सहभाग घेतला.

या काळात त्यांनी महाराष्ट्र पोलिसांच्या विशेष अँटी नक्षल सी ६० कमांडो फोर्स मध्ये एक वर्ष सेवा बजावत नक्षलवादी विरोधात कारवायांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली व जंगल विद्या तंत्र विशेष ऑपरेशन्स आणि धाडसी मोहिमेमध्ये त्यांच्या कार्याची दखल हेच सन २०२२ २३ मध्ये केंद्रीय गृह खात्याकडून आंतरिक सेवा सुरक्षा पथक देऊन त्यांचा सन्मानित करण्यात आला.

त्यानंतर त्यांनी सालेकसा पोलीस स्टेशन येथे अडीच वर्षी सेवा बुजवली पुढे पुणे जिल्ह्यातील नारायणगाव पोलीस स्टेशन येथे साडेतीन वर्ष कार्यरत राहून एक दबंग आणि कर्तव्यदक्ष पोलीस अधिकारी म्हणून ओळख निर्माण केले व त्यानंतर मंचर पोलीस स्टेशन येथे दोन वर्षे सेवा बजावल्यानंतर त्यांना (झख) पदावर पदोन्नती मिळवण्यासाठी साधारणता पाच ते आठ वर्षाचा सर्वसाधारण सेवा काल उत्कृष्ट सेवा अभिलेखा विभागीय मूल्यांकन आणि सेवा जेष्ठता आवश्यक असते सुनील धनवे यांनी आपल्या प्रामाणिक धाडसी आणि उत्कृष्ट सेवेमुळे ही मानाची पदोन्नती मिळवली आहे. त्यांच्या या यशामुळे वाळूज गावासह मोहोळ तालुक्यातील शिरपेचात मानाचा तुरा हरवला असून सामाजिक राजकीय शैक्षणिक आणि विविध क्षेत्रातील मान्यवराकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे युवकासाठी त्यांचा संघर्षमय प्रवास प्रेरणादायी ठरत आहे.

# पंढरपुर शहरात वाहतुक व्यवस्था सुरळीत राहील याची दक्षता घ्यावी

## प्रांताधिकारी सचिन इथापे; जिल्हास्तरीय बँक सल्लागार समितीची बैठक संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : अधिकमास निमित्त श्री विठ्ठल- रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी दररोज हजारो भाविक पंढरपूरात येतात. शहरातील वाहतुक कोंडीमुळे नागरिकांना तसेच येणाऱ्या भाविकांना रहदारीच्या अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. वाहतुक कोंडी टाळण्यासाठी अवजड वाहने बाह्य-वळणाने जातील याची दक्षता घेवून, शहरातील रहदारी सुरळीत ठेवण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात अशा सुचना प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी दिल्या.



अधिकमास निमित्त श्री विठ्ठल-रुक्मिणी भक्त निवास, पंढरपूर येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीस सहा. पोलीस अधिक्षक प्रशांत डगळे, मंदीर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, मुख्याधिकारी महेश रोकडे, पोलीस निरिक्षक दशरथ वाघमोडे, टी.वाय. मुजावर, मंदीर समितीचे व्यवस्थापक प्रविणकुमार घम, लेखाधिकारी मुकेश अनेचा, पाटबंधारे विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी प्रांताधिकारी इथापे म्हणाले, अधिकमास निमित्त दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची संख्या विचारात घेवून, भाविकांच्या सुरक्षेसाठी तसेच वाहतुक व्यवस्था सुरळीत राहण्यासाठी जादा पोलीस बंदोबस्त नेमावा. शहरातील नादुरुस्त सीसीटीव्ही कॅमेरे तात्काळ दुरुस्त करावेत. मंदीर परिसर, प्रदक्षिणा मार्ग येथील अतिक्रमण मोहिम सुरु ठेवावी. वाळवंटात फिरते विक्रेते, वाहने प्रवेश करणार नाहीत याची दक्षता घेवून आवश्यक उपाय योजना कराव्यात. शहरातील अनाधिकृत होर्डींग तात्काळ काढावेत तसेच आचारसंहिता लागू झाल्याने राजकीय होर्डींग तात्काळ काढावेत अशा सूचना प्रांताधिकारी इथापे यांनी दिल्या.

यावेळी सहा. पोलीस अधिक्षक प्रशांत डगळे म्हणाले, अधिकमास निमित्त दर्शनासाठी होणारी गर्दी लक्षात घेवून भाविकांच्या सुरक्षेसाठी आवश्यक पोलीस बंदोबस्त नेमण्यात आलेला आहे. तसेच भाविकांना फिरते विक्रेत्यांचा व अतिक्रमणाचा त्रास होऊ नये यासाठी शहरात नगरपालिका व पोलीस प्रशासनाच्यावतीने मोहिम राबविण्यात येत असल्याचे सांगितले.

अधिकमास कालावधीत श्री विठ्ठल- रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना मंदीर समिती मार्फत आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या असून, भाविकांना दर्शन रांग, दर्शन मंडप येथे मॅट,पिण्याचे पाणी, विश्रांती कक्ष, शौचालय, स्वच्छता, वैद्यकीय उपचार आदी सुविधा देण्यात आल्या आहेत. दर्शन रांगेतील भाविकांचे सुलभ व जलद दर्शन प्राधान्य दिले असून, दर्शनरांगेत घुसखोरी होऊ यासाठी जादा सुरक्षा रक्षकांची नेमणूक केली आहे. भाविकांसाठी दर्शनरांगेत स्प्रिंकलर बसविण्यात आले आहेत. तसेच भाविकांच्या सुविधेसाठी स्वंयसेवक, कंत्राटी कर्मचारी, मंदीर समिती कर्मचारी अशा एकूण १२०० कर्मचारी व स्वयंसेवाची नेमणूक केली असल्याचे मंदीर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगितले.

यावेळी अधिकमास कालावधीत पंढरपूर नगर पालिका प्रशासनाकडून आरोग्य, स्वच्छता, मुबलक पाणी पुरवठा, अतिक्रमण मोहिम आदी बाबतची माहिती मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी यावेळी दिली.

## कॉरिडॉरमध्ये भव्य तीन हेलिपॅड करण्यात येणार पंतप्रधान, राष्ट्रपती, उद्योगपती, कलावंत पंढरपूरला येण्यासाठी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपुरात येणाऱ्या भाविकांना चांगल्या सुख सुविधा मिळाव्या यासाठी पंढरपूर कॉरिडॉर पंढरपूर संविधान विभागाच्या सुविधा करण्यासाठी मंजूर केले आहेत. पंढरपूर मध्ये अति महत्त्वाच्या व्यक्तीमध्ये म्हणून पंतप्रधान, राष्ट्रपती मुख्यमंत्री, उद्योगपती, यांच्यासाठी ५० एकरात भव्य अशी तीन हेलिपॅड करण्यात येणार आहे.

पंढरपूर हे महत्त्वाचे तीर्थक्षेत्र असल्यामुळे पंढरपूर मध्ये येणाऱ्या भाविकांची संख्या वाढू लागली आहे. पंढरपूरमध्ये येणाऱ्या भाविकांना सुख सुविधा देण्यासाठी देण्यासाठी शासनाने कॉरिडरचा निर्णय घेतला आहे. कॉर्डरला नुकत्याच शिखर समितीच्या बैठकीमध्ये मंजूर दिली आहे. भूसंपादित निधी उपलब्ध करून दिला आहे. मात्र अधिक महिना असल्यामुळे भाविकांची संख्या वाढली आहे. त्यामुळे येणाऱ्या भाविकांना चांगल्या प्रकारच्या सुख सुविधा मिळाव्या यासाठी प्रयत्न चालू आहे. पंढरपूर मध्ये येणाऱ्या व्हीआयपी ची संख्या वाढली असून. यासाठी शासनाने कॉरिडॉर करण्याची भूमिका घेतली आहे.

# उंडरगाव येथील मागासवर्गीय मुलीच्या अपहरण प्रकरणातील फरार आरोपीला तात्काळ अटक करा: रिपाइं (आठवले)ची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के. गायकवाड : धाराशिव जिल्हा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया(आठवले) पक्षाच्यावतीने धाराशिव जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांना उंडरगाव तालुका लोहारा येथील मागासवर्गीय मुलींच्या अपहरण प्रकरणातील फरार आरोपी वर पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल करून तात्काळ अटक करण्याबाबत निवेदन देण्यात आले.

जिल्हाधिकारी धाराशिव यांना देण्यात आलेल्या निवेदनात पडले आहे की उंडरगाव ता. लोहारा येथील दिलीप वाघमारे यांच्या अल्पवयीन दलित मुलीस पूस लावून राहत्या घरी येऊन उंडरगाव येथील गावगुंड हनुमान दगडू माने व आशा दगडू माने यांनी जबरदस्तीने घरातून मुलीला मोटरसायकलवर बसून घेऊन गेले आणि तोरंबा टाकी तालुका लोहारा येथील संतोष राम गायकवाड यांच्या हवाली करून त्यांना फरार केले आहे.






सदर प्रकरणी लोहारा पोलीस ठाण्यात दिनांक १६ एप्रिल २०२६ रोजी तक्रार देऊन तब्बल एक महिना ओलांडले आहे तरी त्यांचा अद्याप शोध लागलेला नाही. सदर प्रकरणी अनुसूचित जाती जमाती प्रतिबंध कायदा,अपहरण कायदा बरोबरच पोस्को कायद्यांतर्गत गुन्ह्यात वाढ करून सदर फरार आरोपी यास तात्काळ अटक करून मागासवर्गीय मुलीची सुटका करून त्यांच्या पालकांच्या ताब्यात देण्यात यावे अन्यथा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले धाराशिव जिल्ह्याच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

या वेळी रिपाइं धाराशिव जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष मा.विद्यानंद बनसोडे जिल्हा सरचिटणीस मा.सिद्धार्थ ओव्हाळ जिल्हा कार्याध्यक्ष मा.बाबासाहेब मस्के ,जिल्हा सचिव मा.एस के गायकवाड, मा.भालचंद्र कटारे तालुका अध्यक्ष धाराशिव मा.बाबासाहेब बनसोडे जिल्हा उपाध्यक्ष राजेंद्र शिंदे रिपाइं नळदुर्ग सर्कल प्रमुक यांच्यासह मुलीचे आई-वडील व पदाधिकारी उपस्थित होते.

# अति जोखीम गटातील महिलांसाठी 'ओरल प्रेप' ठरू शकते वरदान : सीमा किणीकर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : जोखीम गटात काम करणाऱ्या महिला तसेच ज्या महिलांचे जोडीदार अति जोखीम गटात कार्यरत आहेत, अशा महिलांसाठी 'ओरल प्रेप' ही औषध पद्धती एचआयव्ही प्रतिबंधासाठी वरदान ठरू शकते. मात्र, संबंधित महिलेची एचआयव्ही तपासणी होणे अनिवार्य असून, एच.आय.व्ही. बाधित नसलेल्या महिलांसाठी ओरल प्रेप प्रभावी व उपयुक्त ठरते, असे प्रतिपादन निरामय आरोग्यधामच्या प्रकल्प संचालिका सीमा किणीकर यांनी केले.

फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखा, निरामय आरोग्यधाम, जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण केंद्र, सोलापूर आणि गीतगंगा सोशल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने अति जोखीम गटातील महिलांसाठी 'ओरल प्रेप' विषयक प्रबोधन व प्रजनन आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी त्या प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या.

यावेळी फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखेच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. कविता चंडक, शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड, समुपदेशिका कल्पना गडगडे, निरामय आरोग्यधामच्या प्रकल्प समन्वयिका गीता कुलकर्णी आदी उपस्थित होते.

डॉ. कविता चंडक यांनी फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखेमार्फत राबविण्यात येणाऱ्या प्रजनन आरोग्य व कुटुंब कल्याण सेवांची माहिती दिली. लहान कुटुंब, सुखी कुटुंब या संकल्पनेसाठी कुटुंब नियोजन साधनांचा वापर, स्त्री व पुरुष नसबंदी, सुरक्षित गर्भपात, तोंडाचा, गर्भाशय मुखाचा व स्तनाचा कर्करोग तसेच स्त्रीरोगांविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड यांनी उपस्थित महिलांनी आपल्या अतिजोखीम असलेल्या व्यवसायातून बाहेर पडून महिला सक्षमीकरणासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले. महिलांना विविध व्यवसायांचे प्रशिक्षण, रिक्षा व फोर-व्हीलर वाहन चालविण्याचे प्रशिक्षण देऊन स्वावलंबी होण्याची संधी उपलब्ध करून दिली जात असल्याचे त्यांनी सांगितले. या मोहिमेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या महिलांनी फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखेकडे नोंदणी करावी, असेही त्यांनी नमूद केले.

या शिबिरात सोलापूर शहरातील सुमारे ७० अति जोखीम गटातील महिलांनी सहभाग घेतला. उपस्थित महिलांची हिमोग्लोबिन, शुगर, रक्तगट, व्हीडीआरएल, एचआयव्ही तसेच क्षयरोगासाठी सस्पूटम तपासणी लॅब टेक्निशियन सत्यभामा कांबळे यांनी केली. स्त्रीरोगांच्या तक्रारी असलेल्या महिलांना आवश्यक औषधोपचार देण्यात आले. तर महिलांचे समुपदेशन कल्पना गडगडे व कंचन बनसोडे यांनी केले. यावेळी उपस्थित महिलांना रेशन कार्डचे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जिया शेख, श्रुती कोल्हापुरे, स्नेहा जटला, विकी शिवशरण, दीपक जमगी, संतोष गायकवाड, सुलोचना साखरे, मीना माने आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण केंद्राचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी कृष्णा सकट व गीतगंगा सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष वेंकटेश कंची यांनी पुढाकार घेतला.




कार्यक्रमाचे स्वागत कांचन बनसोडे यांनी केले. प्रास्ताविक गीता कुलकर्णी यांनी केले. सूत्रसंचालन विकी शिवशरण यांनी केले, तर आभार श्रुती कोल्हापुरे यांनी मानले.

### पॉक्सोअंतर्गत गुन्हा दाखल; पडघा पोलिसांची मध्यरात्री कारवाई, न्यायालयाकडून पाच दिवसांची पोलीस कोठडी

# अल्पवयीन मुलीवरील अत्याचार प्रकरणात आरोपी गजाआड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील पडघा पोलीस ठाण्याच्या हद्दीत अल्पवयीन मुलीवर झालेल्या लैंगिक अत्याचाराच्या गंभीर प्रकरणात पडघा पोलिसांनी आरोपी रोशन उर्फ नाना पवार (वय २२) याला आतकोली पाडा परिसरातून अटक केली आहे. या प्रकरणाची गंभीर दखल घेत भिवंडी जिल्हा सत्र न्यायालयाने आरोपीला पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. या घटनेमुळे तालुक्यात महिला व बाल सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पडघा पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणाऱ्या एका अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली होती. पीडित मुलीच्या कुटुंबीयांनी पडघा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केल्यानंतर पोलिसांनी तत्काळ गुन्हा नोंदवून तपास सुरू केला. आरोपी रोशन पवार याच्याविरुद्ध 'लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण कायदा' (पॉक्सो) तसेच भारतीय न्याय संहितेच्या संबंधित कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आरोपी आपल्या घरी असल्याची गोपनीय माहिती पडघा पोलिसांना मिळाल्यानंतर पोलिसांनी तातडीने सापळा रचला. मध्यरात्रीच्या सुमारास आतकोली पाडा परिसरात छापा टाकून आरोपीला ताब्यात घेण्यात पोलिसांना यश आले. या कारवाईमुळे परिसरात पोलिसांच्या तत्परतेची चर्चा सुरू आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपीला भिवंडी जिल्हा सत्र न्यायालयात हजर करण्यात आले. यावेळी सरकारी पक्षाच्या वकिलांनी आरोपीकडून अधिक चौकशी करणे आवश्यक असल्याचा युक्तिवाद करत पोलीस कोठडीची मागणी केली. न्यायालयाने दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर आरोपीला पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली.

दरम्यान, या गंभीर प्रकरणाची माहिती मिळताच पोलीस उपअधीक्षक राहुल झाल्टे यांनी पडघा पोलीस ठाण्याला भेट देऊन तपासाची माहिती घेतली. त्यांनी अधिकाऱ्यांना तपास वेगाने आणि निष्पक्षपणे पूर्ण करण्याच्या सूचना दिल्याची माहिती सूत्रांनी दिली.

या घटनेमुळे परिसरात संतापाचे वातावरण निर्माण झाले असून, महिला व बालकांच्या सुरक्षेसाठी अधिक कठोर उपाययोजना करण्याची मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे. अशा प्रकारच्या घटना रोखण्यासाठी पोलिसांनी नियमित जनजागृती मोहीम राबवावी तसेच संशयितांवर कठोर कारवाई करावी, अशी प्रतिक्रिया काही नागरिकांनी व्यक्त केली..सदर प्रकरणाचा पुढील तपास पडघा पोलीस ठाण्याचे अधिकारी करीत आहेत.

# आषाढी यात्रेत भाविकांना सुख सुविधा देण्यासाठी अकरा कोटी रुपये अनुदान द्यावे: पंढरपूर नगरपालिकेची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : आषाढी यात्रेमध्ये विठ्ठलाच्या दर्शनाला १८ ते २० लाख व्हावी दाखल होत असतात त्यामुळे येणाऱ्या भाविकांना सुख सुविधा देण्यासाठी शासनाने ११ कोटी रुपयाचा निधी द्यावा अशी मागणी नगर परिषदेने केली आहे.




अधिक महिना असल्यामुळे पंढरपूर येणाऱ्या भाविकांची संख्या वाढली आहे व पंढरीत येणाऱ्या भाविकांना नगरपरिषदेकडून पिण्याचे पाणी स्वच्छता आरोग्य वीज अशा सुविधा दिल्या जातात या सुविधेवर कोट्यावधी रुपयांचा खर्च करावा लागतो आषाढी एकादशी विठ्ठलाला दर्शनाला लाखो भाविक येत असतात असल्यामुळे शासनाकडून प्रतिवर्षी पाच कोटी रुपये निधी देण्यात येत असतो मात्र निधी वेळेत येत नसल्यामुळे नगरपरिषदेला शनिवार कामे करावी लागत असल्याचे म्हणून शासनाने यात्रेच्या अगोदर ११ कोटी रुपये सांगितले द्यावा अशी मागणी नगर परिषदेकडून करण्यात आले आहे आषाढी यात्रेसाठी शासनाने ६१ कोटी निधी दिला असल्याची माहिती जिल्हाधिकारी कीर्तीकियन यांनी केली व जिल्हाधिकारी यांची पहिलीच आषाढी यात्रा असल्याने आषाढी यात्रा चांगल्या प्रकारे पार पाडावी यासाठी त्यांनी लक्ष केंद्रित केले असल्याचे दिसून येत आहे.